# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय**

रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व. ता. जि. ठाणे.

Email ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्र ३६४** दिनांक: २९.१२.२०२१

**वेश्या व्यवसायाच्या अनुषंगाने छापा कारवाई करुन अल्पवयीन मुलीची सुटका करण्यात अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष-भाईंदर पथकास यश.**

दिनांक २८.१२.२०२१ रोजी अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष-भाईंदर यांना गुप्त बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, महिला वेश्यादलाल व तीची साथीदार हया दोघी वेश्यागमनाच्या मोबदल्यात गिऱ्हाईकांना मुली पुरवित असुन अल्पवयीन मुलीला घेवुन भाईंदर पश्चिम येथील चिल आऊट फॅमिली रेस्टॉरंट येथे येणार आहेत.

मिळालेल्या बातमीच्या अनुषंगाने वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. पाटील यांनी बोगस गिऱ्हाईक व पंच यांना साई केशव माधव बिल्डींगमधील चिल आऊट फॅमिली रेस्टॉरंट, कस्तुरी गार्डन जवळ, भाईंदर पश्चिम या ठिकाणी पाठवुन सत्यता पडताळुन पोलीस पथकासह दुपारी १३.३० वाजता छापा टाकला असता महिला वेश्यादलाल व तीची एक साथीदार यांनी अल्पवयीन मुलीसोबत वेश्यागमन करण्याचे बोलीवर १,५०,०००/- रुपये रक्कम ठरवुन पुरुष गिऱ्हाईकांकडुन रक्कम स्वीकारल्याने त्यांना ताब्यात घेवुन अल्पवयीन मुलीची सुटका केली. सदर बाबत पोशि./१२११८ केशव निवृत्ती शिंदे यांनी सरकारतर्फे दिलेल्या फिर्यादीवरुन दोन्ही महिला आरोपी यांचे विरुध्द भाईंदर पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि.नं. I ५४८/२०२१ भा.दं.वि.सं. कलम ३६६ (अ), ३७० (१) (४), ३७२, ३४ सह बालकांचे लैंगीक अपराधापासून संरक्षण अधिनियम २०१२ चे कलम १७, १८, अ. व्या. प्रति. अधि. १९५६ चे कलम ४, ५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई डॉ. श्री. महेश पाटील, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहा. पोलीस आयुक्त, (गुन्हे) मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली व.पो.नि. श्री. संपतराव पाटील, सपोनि तेजश्री शिंदे- भरोसा सेल, पोहवा/९२०१९ विजय निलंगे, पोशि/१२११८ केशव शिंदे, मपोशि/०८००३ सुप्रिया तिवले, चालक पोना/०६१०६ गावडे नेम- अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष-भाईंदर व मपोशि./१३०६० आफ्रिन जुनेरी नेम. भरोसा सेल भाईंदर यांनी केली आहे.

---ooo---